**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-८२६/२०२४**

**अपिलार्थी, श्री.श्रीकांत चंद्रकांत कोळी,**
**रा.हिरुबाई निवास, गावदेवी मंदिराजवळ,**
**दिवाळे गाव, सेक्टर १४, सीबीडी बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा क्षेत्राधिकारी (नमुंआवि) अ.मु.भु.व. (नमुंआवि) विभाग, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.वसाहत अधिकारी, (नमुंआवि), सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.१०.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.११.२०२३ | १७.११.२०२३<br>२२.११.२०२३<br>२९.११.२०२३ | १३.१२.२०२३ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.६.३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "माहिती देण्यास नकार दर्शविणे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २८.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. मनोहर दत्तात्रय कोळी, क्षेत्राधिकारी, (नमुंआवि) अ.मु.भु.व. (नमुंआवि) विभाग, सिडको हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित झालेले शुन्य पात्रता आणि आपेन शेड यांची पात्र आणि अपात्र लोकांची यादी मिळणेबाबत साक्षांकित प्रती सह.(२) वरील विषयाशी संबंधित महाराष्ट्र शासन आणि सिडको प्रशासन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित बांधवानी (लोकांनी) ठरवलेल्या लाभार्थी पात्र प्रकल्पग्रस्तासाठी शासनाने ठरवलेल्या निवड, निष्कर्ष धोरणाची सांक्षाकित प्रती समावेश केलेल्या बांधवाची नावे, सर्व्हे केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नावे, सर्व्हे पावती, सर्व्हे केल्याचा दिनांक व शासनाकडून सर्व्हे किती दिवसाचा ठरविण्यात आला होता व किती दिवसात सर्व्हे पूर्ण झाला सर्व्हे करण्यासाठी शासनाकडून मिळालेल्या परवानगीची प्रती मिळणेबाबत व धोरणाची प्रती मिळाव्यात. (३) वरील विषयांशी संबंधित G.R.च्या सर्व प्रती साक्षांकित करून मिळाव्यात तसेच सिडको मध्ये झालेल्या ठरावांच्या प्रती मिळाव्यात. (४) वरील विषयांशी संबंधित घरासमोर काढलेल्या फोटोंचा चित्रफिती आणि विडीयो रेकॉर्डिंग (Video Recording) मिळणेबाबत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ते अपिलार्थींना उपलब्ध करून देतील. सबब, जन माहिती अधिकारी यांचे हे निवेदन पाहता ते माहिती देण्याबद्दल कोणत्याही प्रकारे निश्चित स्वरूपाचे विधान करू इच्छित नाहीत. **तरी या संदर्भात मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विभाग, सिडको यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देणेबाबतचे शपथपत्र आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.**

आदेश

१. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देणेबाबत मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विभाग, सिडको यांनी त्यांचे शपथपत्र आयोगास दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. ४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,**
**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विभाग, सिडको,**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,**
**सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ